**<u>ठळक बातम्या</u>**

- भारत आणि अमेरिका हे नैसर्गिक भागीदार असून एकमेकांचे जवळचे मित्र असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- नेपाळमधील घडामोडींवर चर्चा करण्यासाठी मंत्रिमंडळ सुरक्षा समितीची प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक, नेपाळच्या सीमेलगत असलेल्या जिल्ह्यांमधे उत्तरप्रदेश आणि पश्चिम बंगाल सरकारचा हाय अलर्ट

- नाशिक जिल्ह्यातल्या शिलापूर इथल्या केंद्रीय विद्युत अनुसंधान संस्थानच्या परीक्षण प्रयोगशाळेचं केंद्रीय उर्जा मंत्री मनोहरलाल खट्टर यांच्या हस्ते उद्घाटन होणार

**आणि**

- आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज भारताची संयुक्त अरब अमिरातीशी लढत

**<><><><><>**

भारत आणि अमेरिका हे नैसर्गिक भागीदार असून एकमेकांचे जवळचे मित्र आहेत, असं मत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केलं आहे. दोन्ही देशांमध्ये व्यापार विषयक चर्चेतून विलक्षण संधीचं दार उघडलं जाणार आहे. दोन्ही देशांची शिष्टमंडळं या क्षेत्रात परस्पर सहमतीच्या जवळ पोहोचण्यासाठी काम करत आहेत, असं प्रधानमंत्र्यांनी आपल्या समाजमाध्यमावरल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. उज्वल आणि समृद्ध भविष्यासाठी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याबरोबर काम करण्याची संधी मिळण्याची अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली असून आपण लवकरच ट्रम्प यांच्याबरोबर चर्चा करणार असल्याचेही त्यांनी म्हटलं आहे.

त्याआधी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समाजमाध्यमावरल्या पोस्टद्वारे भारत-अमेरिका संबंधांबाबत भाष्य केलं होतं. भारताबरोबरच्या व्यापार

संबंधांमधे आलेल्या अडचणींवर मार्ग काढण्यासाठी चर्चा सुरु आहे. येत्या काही दिवसांत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी दूरध्वनीद्वारे संवाद साधणार असून या दोन्ही महान राष्ट्रांमधील चर्चा यशस्वी होण्यात काही बाधा येईल असं मला वाटत नसल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नेपाळमधील घडामोडींवर चर्चा करण्यासाठी मंत्रिमंडळ सुरक्षा समितीची काल बैठक घेतली. नेपाळमधील हिंसा ही हृदयद्रावक आहे. तिथल्या जीवितहानीबद्दल त्यांनी दुःख व्यक्त केलं तसंच नेपाळच्या स्थिरता, शांती आणि समृद्धीचं महत्व आपल्या समाजमाध्यमांवरील संदेशामधून अधोरेखित केलं.

नेपाळमध्ये उद्भवलेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र राज्य आपत्कालीन कार्य केंद्रामार्फत महत्वाच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सध्या नेपाळमध्ये प्रवास टाळावा. जे नागरिक नेपाळमध्ये आहेत त्यांनी आपल्या निवासस्थानीच सुरक्षित राहावं, स्थानिक प्रशासनाच्या तसंच दूतावासाच्या सूचनांचं पालन करावं, कोणत्याही प्रकारच्या मदतीसाठी दूतावासाच्या मदत क्रमांकांवर संपर्क साधावा, अधिकृत माध्यमांद्वारेच दिलेली माहिती ग्राह्य धरावी आणि अफवांपासून दूर राहावं, असं आवाहन या केंद्रामार्फत करण्यात आलं आहे.

एअर इंडिया आणि इंडिगोसहित इतर अनेक विमान कंपन्यांनी नेपाळसाठीची प्रवासी उड्डाणं रद्द केली आहेत.

**दरम्यान**, नेपाळच्या सीमेवर असलेल्या जिल्ह्यांमधे उत्तरप्रदेश आणि पश्चिम बंगाल सरकारनं हाय अलर्ट जारी केला आहे. तसंच या भागात पोलिसांची अतिरिक्त कुमक तैनात करण्यात आली आहे. पश्चिम बंगालमधील दार्जिलिंग जिल्ह्यातल्या नेपाळला लागून असलेल्या भागांमधे गुप्तचर यंत्रणेत वाढ करण्यात आली आहे.

तसंच बलरामपूर, बहरीच, लखीमपूर खेरी, सिद्धार्थनगर, महाराजगंज आणि श्रावस्ती या उत्तरप्रदेशातल्या जिल्ह्यांमधे सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे.

**<><><><><>**

नेपाळमधील आंदोलन करणाऱ्या युवा प्रतिनिधी आणि नेपाळचे सैन्य अधिकारी यांच्यादरम्यान सैन्य मुख्यालयात जुंगी अड्डा इथं रात्री बैठक झाली. सैन्यदल प्रमुख अशोकराज सिगडेल यांनी आंदोलकांच्या विविध गटाच्या प्रतिनिधीच्या मागण्या समजून घेतल्या.

दरम्यान, देशातील सध्याच्या सुरक्षा आव्हानांना लक्षात घेऊन नेपाळ लष्करानं विशेष सुरक्षा प्रक्रिया सुरू केल्या आहेत. लूटमार, जाळपोळ आणि अराजक कारवाया नियंत्रित करण्यासाठी सामान्य नागरिकांनी सक्रियपणे सहकार्य करण्याचं आवाहन सैन्यदलानं केलं आहे. काठमांडू इथं राष्ट्रीय वाणिज्य बँक लुटण्याचा प्रयत्न करणाऱ्या पाच जणांना अटक करण्यात आल्याची माहिती सैन्यदलाच्या प्रतिनिधींनी दिली.

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा कर परिषदेनं नुकत्याच केलेल्या फेररचनेमुळे शेतीसाठी उपयुक्त अनेक वस्तूंवरच्या जीएसटी करात बदल झाला आहे. ऐकूया त्याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**- - होल्ड व्हॉईस कास्ट- -**

(अन्न, औषधं, शेतीविषयक सामग्री, मत्स्योत्पादन अशा विविध घटकांसह अन्य अनेक क्षेत्रांमध्ये जीएसटी दरात कपात करण्यात आली आहे. बांधकाम क्षेत्रासाठी लागणारे संगमरवर, ग्रॅनाईटसारखे दगड, बांबूपासून बनणाऱ्या फरश्या, विविध प्रकारचे गालिचे, रजया यांवरचा जीएसटी १२ टक्क्यांवरून ५ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आला आहे. घर सजावटीसाठी लागणारं लाकडी साहित्य, सुशोभनाच्या वस्तू, लाकडी आणि दगडी मूर्ती, फोटोफ्रेम्स, आरसे, पॅकिंगसाठी लागणारं साहित्य, मेणबत्त्या तसंच विविध प्रकारचं हस्तकला साहित्य, मोती आणि प्रवाळ यांवरचा करही १२ टक्क्यावरून ५ टक्के इतका करण्यात आला आहे. बांधकाम आणि गृहनिर्मितीसाठी लागणाऱ्या विविध प्रकारची सिमेंट, वातानुकूलित यंत्र यावरचा जीएसटी २८ टक्क्यांवरून १८ टक्के करण्यात आला आहे. बायोगॅस, सौर उपकरणं, पवनचक्की अशा विविध उर्जा निर्मितीसाठी लागणाऱ्या साहित्यावरचा करही १२ टक्क्यावरून ५ टक्के करण्यात आला आहे. बायोडिझेल, कोळसा आणि तत्सम इंधन घटक यांवरचा जीएसटी मात्र १२ टक्क्यांवरून १८ टक्के इतका वाढवण्यात आला आहे.)

**<><><><><>**

नाशिक तालुक्यातल्या शिलापूर इथं उभारण्यात आलेल्या केंद्रीय विद्युत अनुसंधान संस्थानच्या परीक्षण प्रयोगशाळा म्हणजेच सी पी आर आय चं उद्घाटन आज केंद्रीय उर्जा मंत्री मनोहरलाल खट्टर यांच्या हस्ते, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या उपस्थिती होणार आहे. शंभर एकर क्षेत्रात साकारलेली ही प्रयोगशाळा महाराष्ट्रच नव्हे तर गुजरात आणि राजस्थान या तीन राज्यातल्या उद्योजकांना उपयुक्त ठरणार असल्याची माहिती कार्यक्रमाचे आयोजक आणि राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दिली.

**<><><><><>**

झारखंडच्या दहशतवाद विरोधी दलाच्या पथकाने आज आयसिसच्या एका संशयित दहशतवाद्याला रांची इथून अटक केली. त्याच्याकडून अनेक इलेक्ट्रॉनिक उपकरणं जप्त करण्यात आली आहेत. या संशयित दहशतवाद्याची ओळख पटली असून तो मूळचा बोकारो जिल्ह्यातल्या पेटारवार इथला आहे. त्याची सखोल चौकशी करण्यात येत आहे.

**<><><><><>**

ट्राय अर्थात दूरसंचार नियामक प्राधिकरणानं सर्व वितरण व्यासपीठांना आपल्या कार्याचा मासिक किंवा त्रैमासिक अहवाल देण्याचे निर्देश दिले आहेत. हे निर्देश देशातल्या सर्व डीटीएच, हेडेड इन स्काय, मल्टी सिस्टीम ऑपरेटर आणि इंटरनेट प्रोटोकॉल टेलिव्हीजन ऑपरेटरना लागू होणार आहेत. दूरसंचार मंत्रालयानं जारी केलेल्या पत्रकात म्हटलं की, केबल टीव्ही आणि संगणक क्षेत्राची व्याप्ती वाढत असताना ग्राहक हित आणि पारदर्शकता जपण्यासाठी हे अहवाल मागवण्यात येत आहेत. सर्व ऑपरेटरांनी निर्धारित प्रारुपात हे अहवाल सादर करायचे आहेत.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमधल्या मुसळधार पाऊस आणि सततच्या भूस्खलनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर माता वैष्णौदेवी यात्रा आज १५ व्या

दिवशीही बंद ठेवण्यात आली आहे. माता वैष्णौदेवी मंदिर प्रशासनानं लोकांना संयंम राखण्याचं आणि कोणत्याही मार्गानं मंदिरात जाण्याचा प्रयत्न न करण्याचं आवाहन केलं आहे.

**<><><><><>**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत भारताचा पहिला सामना आज दुबईत संयुक्त अरब अमिरातीशी होणार आहे. स्पर्धेतल्या काल झालेल्या पहिल्या सामन्यात अफगाणिस्तानने हाँगकाँगवर ९४ धावांनी विजय मिळवला. अफगाणिस्ताननं प्रथम फलंदाजी करताना ६ बळीच्या बदल्यात १८८ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करताना हाँगकाँगच्या संघाला ९४ धावांपर्यंतच मजल मारता आली.

येत्या २८ सप्टेंबरपर्यंत सुरू राहणाऱ्या या स्पर्धेच्या अ गटात भारत, पाकिस्तान, ओमान आणि यूएईचा समावेश आहे. तर ब गटात श्रीलंका, अफगाणिस्तान, हाँगकाँग आणि बांगलादेश यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

पूर्व आणि द्वीपकल्पीय क्षेत्रात पुढील चार ते पाच दिवस मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता भारतीय हवामान विभागानं वर्तवली आहे. पश्चिम बंगाल, सिक्कीम इथंही आज मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. मध्य प्रदेशाच्या पूर्व भागात तसंच छत्तीसगड, बिहार आणि ओदिशा इथं आज आणि पुढच्या तीन ते चार दिवसांत मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. तामिळनाडू, केरळ, कर्नाटकचा दक्षिण भाग, आंध्र प्रदेशाची किनारपट्टी, तेलंगणा इथंही उद्यापर्यंत पावसाचा अंदाज वर्तवला आहे. आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा आणि अरुणाचल प्रदेशात आज आणि उद्या मेघगर्जनेसह हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**//<><><><><>//**